# महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे “आयडॉल्स”

## महात्मा फुले कृषि विद्यापीठ “कृषि पदवीधर आयडॉल”

### श्री. सागर मनोहर महाजन

कृषि उद्योजक, कृषि महाविद्यालय, कोल्हापूर (२०१६)

६३०/३ बी वार्ड, शाहू चौक, ॲस्टर आधार हॉस्पीटलच्या मागे, कोल्हापूर



संपर्क क्रं. : ७७०९३१५२६९

**उद्योगाचे नांव व माहिती**

- ॲक्वा प्लानेट, कोल्हापूर
- उद्योगाची सुरुवात - सन २०१६ पासून

**उद्योगामधील नाविण्यपूर्ण तंत्रज्ञान**

- महाविद्यालयाच्या शेवटच्या सत्रामध्ये असताना उद्योगाची सुरुवात केली
- मुंबई, आंध्रप्रदेश या ठिकाणी भेटी देवुन पुरवठादारांचा पाठपुरावा केला
- उद्योग करताना येणाऱ्या अडचणींसाठी रत्नागिरी मत्स्य महाविद्यालय व राजस्थानमधील ऑरनामेंटल फिशरी ट्रेनिंग ॲण्ड रिसर्च इंन्स्टीट्यूट याच्या स्थाई शिबिरामध्ये प्रवेश घेतला
- मिळवलेली माहिती ग्राहकांपर्यंत पोहचविण्यासाठी माहिती पत्रके काढुन प्रबोधन केले
- सर्व कामगारांची कार्यक्षमता वाढावी यासाठी त्यांना प्रशिक्षण (ग्राहक संवाद, वेळेचे व्यवस्थापन, व्यवसायातील अडचणींचा सामना करण्याची पध्दत) समजावुन सांगितली
- जर्मनी आणि जपान या देशातील प्रगत तंत्रज्ञान आणून सर्व ग्राहकांना खुले केले
- पाण्याच्या आतमध्ये वाढणाऱ्या झाडांचा अभ्यास करुन पाण्यामध्ये त्यांच्या सुबक रचना केल्या व उद्योगाला गती दिली
- गोड्यापाण्याबरोबर खाऱ्या पाण्यातील शोभिवंत माशांच्या व्यवसायाला चालना दिली
- बाहेरील देशांमधून आयात होणारे मासे आणि इतर जलचर यांची साठवणूक करुन विपणन केले

**वार्षिक उलाढाल : रु. ७२ लाख**

**व्यावसायिक / सामाजिक क्षेत्रातील योगदान**

- शोभिवंत मत्स्यपालन हा कृषिपूरक व्यवसाय वाढावा यासाठी जवळपासच्या शेतकऱ्यांनी वाढवलेल्या माशांना बाजारपेठ उपलब्ध करुन दिली
- माशांचे प्रजोत्पादन, आजार नियंत्रण, पाणी व्यवस्थापन यांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहचवली

**रोजगार निर्मिती:**

- २० पेक्षा अधिक मजुरांना रोजगार दिला












## महात्मा फुले कृषि विद्यापीठ “शेतकरी आयडॉल”

### बीजमाता

### पद्मश्री सौ. राहिबाई सोमा पोपेरे

रा. कोभांळणे, ता. अकोले. जि. अहमदनगर



संपर्क क्रं.:

**शिक्षण :** ११ वी.

**जमीनधारणा क्षेत्र :** ६० एकर (एकत्रित कुटुंबाची)

**पीक विविधता :** एन.एम.के.-१ गोल्डन सिताफळाची बाग, शेवगा

**शेती निगडीत व्यवसाय :** सिताफळ रोपवाटीका, जॉन डिअर ट्रॅक्टर शो रुम

**शेतीमधील उल्लेखनीय संशोधन कार्य**

- सुरुवातीला रासायनिक शेतीकडे कल. परंतु, रासायनिक औषधे व किटकनाशके जास्त प्रमाणात वापरल्याने त्याचा आरोग्यावर होणारा विपरीत परिणाम घरातील वाढते आजारपण यामुळे लक्षात आला
- त्यानंतर परसबागेतील गावराण भाजीपाला उत्पादन घरी खाण्यासाठी सुरु केले
- बायफच्या तज्ञांनी मार्गदर्शन केले. त्यानुसार झाडांच्या बुंध्याभोवती दगडाचे अच्छादन केल्यामुळे अत्यंत कमी पाण्यात झाडे तग धरु लागली
- परसबागेत देशी गावराण बियांचा संग्रह वाढल्यामुळे बायफ संस्थेच्या मार्गदर्शनानुसार सन २०१६ मध्ये राहत्या घरात बियाणे बँक सुरु करण्यात आली
- या बीजबँकेत ५४ पिकांचे ११६ विविध प्रकारचे गुण वैशिष्ट्ये असलेले वाण उपलब्ध असुन यामध्ये वाल व पावट्याच्या २० वाणांचा संग्रह आहे
- हे सर्व वाण प्रोटिनयुक्त व कमी पाण्यावर येणारे तसेच काही वाण तर हवेतील ओलाव्यावर येणारे आहेत
- याशिवाय भात, नागली, वरई या सारख्या सुमारे ३० विविध प्रकारच्या भाज्या, तेलवर्गिय पिके, तृण व गळीत धान्य असे विविध वाण त्यांनी जतन केले आहेत

**तंत्रज्ञानाचा प्रसार**

- बीजबँकेमार्फत पारंपारीक वाणांचा प्रचार व प्रसार करण्याबरोबरच राज्य व देश पातळीवरील प्रदर्शनातून सहभाग नोंदविला आहे
- शाळा, महाविद्यालये, बचतगट, चर्चासत्रे, शिबीरे व शेतकरी प्रशिक्षणे या माध्यमातून देशी वाणांचा प्रसार
- आदिवासी भागातील महिला बचत गट तसेच कळसुबाई परिसर बियाणे संवर्धन, सामाजिक संस्थे मार्फत स्थानिक वाणांचे संवर्धन व प्रसार कार्य बायफच्या मदतीने सुरु आहेत

**पुरस्कार**

- भारत सरकारचा पद्मश्री पुरस्कार - २०२१
- वसंतराव नाईक शेती मित्र पुरस्कार - २०१७
- बायफचा आदर्श शेतकरी पुरस्कार - २०१५
- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ जीवन गौरव पुरस्कार
- आदिवासी विभागाचा आदिवासी सेवक पुरस्कार
- झी मिडीयाचा अनन्य पुरस्कार
- कृषि विभागाचा राज्यस्तरीय जिजामाता कृषिभूषण पुरस्कार
- जिल्हा परिषद, अहमदनगर आदर्श शेतकरी पुरस्कार
- आयबीएन लोकमत न्यूज १८ आदर्श शेतकरी पुरस्कार
- भारत सरकार नारीशक्ती पुरस्कार - २०१८
- रयत शिक्षण संस्था - लक्ष्मीबाई भाऊराव पाटील जीवन गौरव पुरस्कार - २०२२






## विस्तार शिक्षण संचालनालय, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

नोव्हेंबर, २०२३